divyamarathi.com

# माहितीच्या डिजिटलायझेशनसाठी 'डी स्पेस' सॉफ्टवेअर आवश्यक

## के. टी. एच. एम. ग्रंथालयाच्या वतीने राज्यस्तरीय कार्यशाळेचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन

### डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले मार्गदर्शन

प्रतिनिधी | नाशिक



'डी स्पेस' सॉफ्टवेअरविषयी मार्गदर्शन करताना डॉ. राजेंद्र कुंभार. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

विविध संस्थांकडे असलेल्या महत्त्वाच्या माहितीचे डिजिटलायझेशन करण्यासाठी 'डी स्पेस रिपॉझिटरी' या सॉफ्टवेअरचा प्रभावी उपयोग होत आहे. हे ओपन अॅक्सेस सॉफ्टवेअर असून याचा ग्रंथालयांनी वापर करावा, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जयकर ग्रंथालयाचे मुख्य ग्रंथपाल डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बीसीयूडी व केटीएचएम महाविद्यालयाचे ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय 'डिझाइन अॅण्ड डेव्हलपमेंट ऑफ इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटोरीज युजिंग डिस्पेस' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे चिटणीस डॉ. सुनील ढिकले, प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर, पुण्याचे गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे ग्रंथपाल डॉ. नानाजी शेवाळे, वैद्यकशास्त्र प्राध्यापिका व पेटेंट सल्लागार प्रा. डॉ. मृदुला बेळे, पुण्याच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या अधिकारी डॉ. सुनीता बर्वे, ग्रंथपाल संजय आहेर, सुधीर मुरकुटे उपस्थित होते.

आज इंटरनेटवर विविध जर्नल्स, रिसर्च पेपर्स उपलब्ध आहेत. 'डी स्पेस डिपॉझिटरी' कार्यशाळेच्या माध्यमातून आपल्याला स्थानिक पातळीवर असलेली माहिती सर्वदूर उपलब्ध होऊ शकते. सॉफ्टवेअरची तांत्रिकदृष्ट्या प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून माहिती होईल, या माहितीचा उपयोग वाचकांसाठी केल्याने वाचक हा स्वतः तुमच्या संपर्कात राहील, असेही डॉ. कुंभार यांनी सांगून नाशिकमध्ये प्रथमतः होणाऱ्या कार्यशाळेला शुभेच्छा दिल्या.

बदल ही काळाची गरज असून ग्रंथालयांमध्ये डिजिटलायझेशन होत आहे, त्यांच्याकडे अधिकाधिक माहिती संग्रहित करण्यासाठी 'डी स्पेस डिपॉझिटरी' ही कार्यशाळा निश्चित उपयोगी ठरेल. प्राचीन ऐतिहासिक ग्रंथांचे डिजिटलायझेशन झाल्यास पुढच्या अनेक पिढ्यांपर्यंत या ज्ञानाचा उपयोग होईल, असे चिटणीस डॉ. सुनील ढिकले यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले. अद्ययावत तंत्रज्ञानाची माहिती सगळ्यांना आवश्यक असून, या माहितीचे ज्ञानाच्या दृष्टीने सगळ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे, ग्रंथालयाचे माहिती संग्रह तसेच ते मोफत वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'डी स्पेस रिपॉझिटरी' कार्यशाळा महत्त्वाची ठरेल, असे प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर यांनी प्रास्ताविकात सांगितले. कार्यशाळेसाठी अनिल पाटील व सर्व ग्रंथालय कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन डॉ. डी. पी. पवार यांनी केले. ग्रंथपाल संजय आहेर यांनी आभार मानले.